# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
# (म्हाडाचा घटक)
## गिरणी कामगार / वारसांच्या माहिती संकलनामध्ये गिरणी संकेत क्रमांकामधील दुरूस्तीसाठी संधी देण्याबाबत
## जाहिर सुचना

बृहन्मुंबई महानगर पालीका क्षेत्रातील बंद / आजारी गिरण्यांच्या कांमगार / वारसाकडून म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत सन २०१०-२०११ मध्ये सारस्वत बँक व ॲक्सिस बँकेमार्फत तसेच मे -जुलै २०१७ मध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे विहित नमुन्यातील मागवून माहिती संकलीत करण्यात आली. सदर माहितीची गिरणीनिहाय यादी म्हाडाच्या संकेत स्थळ https://mhada.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर यादीमध्ये गिरणी कामगारांच्या गिरणी संकेत क्रमांक अथवा गिरणीच्या नावात बदल झालेला असल्यास अशा गिरणी कामगार / वारस अर्जदारांनी दि. ०२/०८/२०१९ ते दि. १४/०८/२०१९ या कालावधीत (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत) विहित नमुन्यामध्ये आवश्यक त्या पुराव्यासह अर्ज सादर करावा.

१) **विहित नमुन्यातील अर्ज मिळण्याचे ठिकाण :-**

- म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.maharashtra.gov.in
- उपमुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी) / मुं.मं.,कक्ष क्र.२०५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१

२) **अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-**

- उपमुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी) / मुं.मं.,कक्ष क्र.२०५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१

३) **विहित नमुन्यातील अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

- बँकेत अथवा ऑनलाईन अर्ज भरल्याची पोचपावती, ओळखपत्र, आवश्यक असणारे गिरणीबाबतची कागदपत्रे, इत्यादी (सर्व कागदपत्रे स्वसाक्षांकीत करावी)

**टिप :-**

- यापूर्वी दुरूस्तीसाठी केलेल्या अर्जाचा किंवा उपरोक्त विहित मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी.
- म्हाडाच्या संकेतस्थळावर नोंद असलेल्या अर्जदारांनाच गिरणी संकेत क्रमांक दुरूस्तीसाठी अर्ज सादर करता येईल. म्हाडाच्या संकेतस्थळावर नोंद असलेल्या यादीबाहेरील अर्जदारांना दुरूस्ती अर्ज किंवा नवीन अर्ज सादर करता येणार नाहीत, असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- उपरोक्त सुचनेच्या अनुषंगाने गिरण्यांच्या संकेत क्रमांकामधील बदलाबाबतची दुरूस्ती न केल्यामुळे गिरण्यांच्या जागेवरील सोडतीमध्ये चुकीच्या संकेत क्रमांकामुळे यशस्वी अर्जदारांना अपात्र करण्यात येईल तसेच त्याबाबत सोडतीनंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.

(दीपेन्द्र सिंह कुशवाह)
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई

# म्हाडा संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या गिरणी संकेत क्रमांक व अर्ज क्रमांक यामध्ये दुरुस्ती करावयाचा नमुना अर्ज

दिनांक : -

प्रति,
उपमुख्य अधिकारी(धापुप्र/गिरणी)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
वांद्रे(पुर्व), मुंबई-४०००५९

**विषय** : गिरणी संकेत क्रमांकात व अर्ज क्रमांकात दुरुस्ती करणेबाबत विनंती अर्ज

**संदर्भ** : म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीतील गिरणी संकेत क्रं---- व अर्ज क्र.----

महोदय,

मी स्वत: /माझे वडील/ माझी आई/पत्नी/आजी/आजोबा नामे ------------------------------- यांनी गिरणी कामगारांच्या घरासाठी सारस्वत बँक /ऑनलाईन अर्ज सादर केला होता. सदर अर्जाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**१) <u>म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती</u>**

| | |
|---|---|
| गिरणी संकेत क्रमांक व गिरणीचे नाव | |
| अर्ज क्र. | |
| म्हाडाच्या संकेतस्थळावरील अर्जदाराचे नाव | |

म्हाडाच्या संकेतस्थळावरील उपरोक्त नावामध्ये तसेच कार्यालयीन अभिलेखामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात यावा, अशी आपणांस विनंती करण्यात येते.

**२) <u>दुरूस्त करावयाची माहिती</u>**

- **अ) गिरणी संकेत क्रमांक व गिरणीचे नावात बदल करावयाचा असल्यास.**

| | |
|---|---|
| सुधारित गिरणी संकेत क्रमांक. | |
| सुधारित गिरणीचे नाव. | |

- **ब) अर्ज क्रमांकात बदल करावयाचा असल्यास.**

| | |
|---|---|
| सुधारित अर्ज क्रमांक. | |

- **क) नको असेल ते खोडावे.**

वरील प्रमाणे माहितीत बदल करण्यास माझी कोणतीही हरकत नाही. भविष्यात वरील बदल झालेल्या माहितीमध्ये म्हाडा कार्यालय जबाबदार राहणार नसून मी व्यक्तीश: वरील केलेल्या बदल /दुरूस्तीस जबाबदार राहीन व या बदलास माझी अथवा माझ्या वारसांची कोणतीही तक्रार नसुन त्याबाबत मी न्यायालयात दाद मागणार नाही. वरील विनंतीनुसार बदल /दुरूस्ती करण्याबाबतचा मा.मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांचा निर्णय मला मान्य राहील.

**दिनांक :-** **स्वाक्षरी -------------------------------**
**ठिकाण :-** **गिरणी कामगार / वारसाचे नाव - ------------------------------------------------------**

**भ्रमणध्वनी क्र. :-**
**ओळखपत्र क्र.**

**<u>टिप</u> :-** अर्जदाराने आपल्या विनंतीच्या अनुषंगाने बँकेत अर्ज भरल्याची पोचपावती, ओळखपत्र, गिरणी संकेत क्रमांक बदल / दुरूस्ती करावयास आवश्यक असणारी गिरणीबाबतची स्वसाक्षांकीत कागदपत्रे सदर अर्जासोबत जोडावीत.